# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.03.2026** **वारः बुधवार**

---

1. आखाती प्रदेशातील सर्व भारतीय खलाशी आणि जहाजं सुरक्षित; देशभरात पेट्रोल आणि डिझेल पुरेशा प्रमाणात उपलब्ध
2. एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसची पश्चिम आशियाई देशांकरता आज ५० विमान उड्डाणं
3. पश्चिम आशियामध्ये इराक आणि दोहाला लक्ष्य करून एकत्रितपणे केलेल्या हवाई हल्ल्यांमुळे तणावामध्ये वाढ
4 . सिक्कीमच्या 'शेप ऑफ मोमो' चित्रपटाला रशिया आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा'त दोन मोठे पुरस्कार आणि
5. विदर्भ, छत्तीसगड, हिमाचल प्रदेशात गारपिटीसह वादळी पावसाचा इशारा

<u>आखातीप्रदेश</u>

आखाती प्रदेशातील सर्व भारतीय खलाशी आणि जहाजं सुरक्षित असल्याची माहिती बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी दिली आहे. नवी दिल्ली इथे 'पश्चिम आशियातील अलीकडील घडामोडीं'वर आयोजित आंतर-मंत्रालयीन बैठकीत काल ते बोलत होते. गेल्या काही तासांत आखाती प्रदेशात आपली सेवा पूर्ण करून १६१ भारतीय खलाशांना मायदेशी परत आणण्यात आलं आहे. 'नंदा देवी' हे दुसरं एलपीजी वाहक जहाज काल पहाटे गुजरातच्या कांडला बंदरात पोहोचलं असून 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' ही दोन्ही एलपीजी वाहक जहाजं रिकामी करण्याचं काम सुरू आहे. या बैठकीला संबोधित करताना, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी देशभरात पेट्रोल आणि डिझेल पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचा पुनरुच्चार केला.

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी ब्रसेल्सच्या आपल्या दौऱ्यादरम्यान, युरोपियन युनियनमधील विविध देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांशी जागतिक आव्हानांवर चर्चा केली; या चर्चेत पश्चिम आशियातील परिस्थिती आणि ऊर्जेच्या सुरक्षिततेवर होणारा तिचा परिणाम यावर विशेष भर देण्यात आला. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी या बैठकीत याविषयी माहिती दिली. परराष्ट्र मंत्रालयातील 'आखाती विभागाचे अतिरिक्त सचिव असीम महाजन यांनी 'सेफ-सी विष्णू' या तेलवाहू जहाजावरील १५ भारतीय कर्मचाऱ्यांना

लवकरात लवकर मायदेशी परत आणण्यासाठी भारताचं एक विशेष पथक घटनास्थळी कार्यरत असल्याची माहिती दिली.

<u>एअरइंडिया</u>

एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसची आज पश्चिम आशिया दरम्यान ५० विमानं उड्डाण करतील. यापैकी २६ उड्डाणे नियोजित असून **24** अनियोजित असल्याचं एअर इंडियाने एका निवेदनात म्हटलं आहे. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे या प्रदेशातील विमानसेवा विस्कळीत झाली आहे.

<u>कतारदूतावास</u>

कतारमधील हवाई हद्दीवरील निर्बंधांदरम्यान, कतार एअरवेजने काल भारतासाठी पाच विमानसेवा चालवल्या, यामधून **1600** पेक्षा अधिक भारतीय नागरिकांनी प्रवास केला. आजपासून नऊ भारतीय ठिकाणांसाठी विमानसेवा सुरू केली आहे. कतारमधील भारतीय मच्छीमार समुदायाच्या सदस्यांना शिधावाटपही सुरू आहे.

<u>इराणमृत्यू</u>

इराणचे राष्ट्रीय सुरक्षा प्रमुख अली लारीजानी आणि बसिज दलाचे प्रमुख गुलाम रझा सोलेमानी यांचा इस्रायलच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याच्या वृत्ताला इराणनं पुष्टी दिली आहे. अमेरिका लारीजानी हे दिवंगत नेते अयातुल्ला अली खामेनी आणि त्यांचे पुत्र मोजतबा खामेनी यांचे विश्वासू असल्याचं मानलं जातं . इराणच्या फार्स वृत्तसंस्थेनुसार, लारीजानी आणि सोलेमानी यांना काल रात्री ठार करण्यात आलं. जानेवारी महिन्यात इराणच्या ४७ वर्षांच्या राजवटीला आव्हान देणारी निदर्शनं इराण मध्ये झाली होती, त्यावेळी निदर्शकांवर इराणनं केलेल्या हिंसक कारवाईत त्यांची प्रमुख भूमिका होती.

<u>हल्ले</u>

पश्चिम आशियामध्ये इराक आणि दोहाला लक्ष्य करून एकत्रितपणे केलेल्या हवाई हल्ल्यांमुळे तणाव वाढला आहे. बगदादच्या ग्रीन झोनमधील अमेरिकी दूतावासावर ड्रोन आणि रॉकेटने हल्ला करण्यात आला, तर शहरात अन्य ठिकाणी झालेल्या हल्ल्यांमध्ये इराणी सल्लागारांसह चार जण ठार झाले. कताएब हिजबुल्लाहचे अबू अली अल-अस्करी यांच्या हत्येनंतर झालेल्या या हिंसाचाराचा इराकचे पंतप्रधान मोहम्मद शिया अल-सुदानी यांनी निषेध केला आहे. दरम्यान, इराणकडून १४ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि अनेक ड्रोन डागल्यानंतर कतारने दोहावर हवाई संरक्षण प्रणाली सक्रिय केली असून यामुळे मोठ्या संघर्षाची भीती निर्माण झाली आहे.

<u>लोकसभा</u>

लोकसभेत आज कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या २०२६-२७ वर्षासाठीच्या 'अनुदान मागण्यां'वर चर्चा होऊन मतदान होणार आहे. याशिवाय , गृह मंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय आणि ऊर्जा मंत्रालय यांच्या अखत्यारीतील अनुदानाच्या मागण्यांवरही चर्चा आणि मतदान करण्याचं नियोजित आहे.
लोकसभेत काल संध्याकाळी रेल्वे मंत्रालयाच्या अखत्यारीतील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना, गेल्या १० वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रेल्वेची आर्थिक स्थिती लक्षणीयरीत्या सुधारली असल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

मोदी-नाहयान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायद अल नाहयान यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. दोन्ही नेत्यांनी पश्चिम आशियातील सद्यस्थितीवर चर्चा केली. अमिरातीवरील हल्ल्यांचा भारत तीव्र निषेध करतो असं पंतप्रधानांनी आपल्या  समाज माध्यमावरील संदेशातही  म्हटलं आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षित आणि मुक्त जलवाहतूकीच्या मुद्द्यावर दोन्ही देशांची सहमती  झाली. या प्रदेशात शांतता, स्थैर्य आणि सुरक्षितता लवकरच पुनरस्थापित करण्यासाठी दोन्ही देश एकत्रितपणे कार्यरत राहतील असंही मोदी यांनी म्हटलं आहे.

ट्रम्प

बहुतांश नाटो मित्र राष्ट्रांनी इराणविरुद्धच्या अमेरिकेच्या लष्करी कारवाईत सामील होण्यास नकार दिला आहे असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. ट्रम्प यांनी या संघटनेवर टीका करत अमेरिकेला परकीय मदतीची गरज नसल्याचं  सांगितलं. या देशांची अनिच्छा असूनही, आम्ही जे करत आहोत त्याला जवळजवळ प्रत्येक देशाचा ठाम पाठिंबा आहे आणि इराणला कोणत्याही परिस्थितीत अण्वस्त्र बाळगण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही असंही ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

रशियासंयुक्तराष्ट्र

परराष्ट्र मंत्रालयाच्या पश्चिम विभागाचे सचिव सिबी जॉर्ज आणि रशियाचे उप-परराष्ट्र मंत्री अलेक्झांडर अलिमोव्ह यांनी सातव्या भारत-रशिया-संयुक्त राष्ट्र चर्चेचं सह-अध्यक्षपद भूषवले. काल नवी दिल्लीत झालेल्या या बैठकीत  दोन्ही बाजूंनी संयुक्त राष्ट्रांमधील आपापल्या प्राधान्यांची  एकमेकांना माहिती दिली. या चर्चेत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या कार्यपद्धतीच्या संबंधित मुद्द्यांवर, आणि प्रामुख्याने दहशतवादविरोधी मोहीम, शांतता मोहीम, सुरक्षा परिषदेतील सुधारणा यांसारख्या विषयांवरही लक्ष केंद्रित करण्यात आलं.

धर्मस्वातंत्र्य

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, 2026 काल महाराष्ट्र विधानपरिषदेतही बहुमतानं मंजूर झालं. या विधेयकाचा उद्देश कुठल्याही एका धर्माला लक्ष्य करणं हा नाही. केवळ हिंदू-मुस्लिम यादृष्टीनं याकडे बघू नये. सर्व धर्मांसाठी ते समानच राहील, अशी ग्वाही गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी या विधेयकावरच्या चर्चेच्या उत्तरात दिली. हे विधेयक स्वेच्छेनं होणारं धर्मांतर थांबवत नाही, कोणाच्याही धर्मस्वातंत्र्यावर घाला घालत नाही, केवळ गैरमार्गानं केलं जाणारं धर्मांतर थांबवणं हा या विधेयकाचा हेतू आहे, असं त्यांनी सांगितलं.

**महा-विधेयक**

महाराष्ट्र विधानसभेने 'महाराष्ट्र निरसन विधेयक, २०२६' मंजूर केलं. यामुळे १८२५ चा 'बंगाल नियमन कायदा' आणि 'मुंबई अबकारी कायदा' यांसह ८० कालबाह्य कायदे रद्द करण्यात आले. यामध्ये मुंबई, बंगाल, मध्य प्रांत आणि बेरार, हैदराबाद आणि मध्य प्रदेश मधून उगम पावलेल्या विविध कायद्यांचा आणि नियमांचा समावेश आहे.

**अर्जेंटिना**

अर्जेंटिनाने WHO म्हणजेच जागतिक आरोग्य संघटनेतून बाहेर पडण्याच्या आपल्या निर्णयानुसार अमेरिकेच्या पावलावर पाऊल टाकत WHO सोबत असलेले संबंध औपचारिकरित्या संपुष्टात आणले आहेत.

**सिक्कीमचित्रपटपुरस्कार**

सिक्कीमच्या ‘शेप ऑफ मोमो’ या चित्रपटाने रशियातील हांटी-मानसिइस्क इथे आयोजित ‘स्पिरिट ऑफ फायर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा’त दोन मोठे पुरस्कार पटकावले. सिक्कीमचे चित्रपट निर्माते त्रिबेनी राय यांच्या नेपाळी भाषेतील पहिल्याच चित्रपटाला काल सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय पदार्पण चित्रपटासाठी ‘सिल्व्हर तैगा पुरस्कार’ तसंच पारंपरिक आणि सांस्कृतिक मूल्यांचं जतन केल्याबद्दल रॉसकाँग्रेस फाउंडेशनचा ‘सोल ऑफ रशिया - वर्ल्ड सिनेमा विशेष पुरस्कार’ देऊन सन्मानित करण्यात आलं .

**बॅडमिंटन**

बॅडमिंटनमध्ये, भारताच्या आकर्षी कश्यपने काल तिचे दोन्ही पात्रता सामने जिंकून, 'ऑर्लिन्स मास्टर्स २०२६' बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या मुख्य फेरीत प्रवेश मिळवला आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने आज विदर्भ , छत्तीसगड, हिमाचल प्रदेश या भागांसाठी, गारपिटीसह वादळी पावसाचा इशारा दिला आहे. आज हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, छत्तीसगड, मध्य प्रदेश, गुजरात, महाराष्ट्र आणि अंतर्गत कर्नाटक या भागांत विजांसह वादळी वारे वाहतील.

जम्मू आणि काश्मीर, लडाख, झारखंड, बिहार, आंध्र प्रदेश, केरळ, माहे, ओडिशा, तेलंगणा, पश्चिम बंगाल आणि सिक्कीम या भागांतही अशीच स्थिती राहील. याव्यतिरिक्त, उद्यापर्यंत किनारपट्टीवरील कर्नाटक, कोकण, गोवा, तसेच तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल आणि राजस्थान या भागांत विजांसह वादळी पाऊस पडेल, असाही अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.